वास्तुशास्त्र : खरं किती, खोटं किती ?

संजय जोशी

आधुनिक युगात वास्तुशास्त्राला अनन्यसाधारण महत्त्व आलं आहे. या शास्त्राचा आधार घेऊन हजारोंनी आपल्या आयुष्यात आमूलाग्र बदल केला आहे. या शास्त्राबद्दल असणारे गैरसमज दूर करुन मानवी जीवन सुखी व्हावं, सर्वांना परवडेल अशा रीतीने या शास्त्राचा लाभ व्हावा यासाठी डॉ. रविराज अहिरराव यांनी 'वास्तुशास्त्र रिसर्च फाऊंडेशन' या संस्थेची स्थापना केली आहे. या शास्त्राविषयी जाणून घेतानाच या संस्थेची माहिती देणारा लेख.

घर असावं घरासारखं,
नकोत नुसत्या भिंती
त्यात असावा प्रेमजिव्हाळा,
नकोत नुसती नाती'

मनातल्या घराची ही कल्पना अनेक काव्यातून उत्कटपणे व्यक्त झालेली दिसते. घराचं घरपणं टिकवून ठेवण्यासाठी घरातील माणसं त्यांच्यातील नातेसबंध या गोष्टी तर महत्त्वाच्या आहेतच पण त्याचबरोबर किंबहुना त्या पलीकडे जाऊन इतर अनेक गोष्टी महत्त्वाच्या असतात. वास्तुशास्त्र हे त्यापैकीच एक. एखाद्या घरात लौकिकार्थाने आवश्यक असणाऱ्या साऱ्या गोष्टी असतात. गाडी, बंगला, वैभवाची साक्ष देणारं फर्निचर, चित्रपटात शोभावी, अशी अंतर्गत सजावट, या साऱ्या गोष्टी असल्या तरी घरात मात्र कायम चिडचिड नैराश्य, काळजी, संघर्ष, तणाव अशा नकारात्मक गोष्टींचा वास असतो. पर्यायाने घराचं घरपणं हरवून जातं. घराला असणारी मायेची ऊब हरवून या नकारात्मक भावनांची, अशांततेची आग कुटुंबाचं जगणं हैराण करुन सोडते. हे असं का होतं? एखाद्या लहानशा घराला असणारं वैभव एखाद्या अलिशान बंगल्याला का मिळत नाही? एखादं घर लाभतं म्हणजे काय? घराची हरवलेली शांती परत कशी मिळवता येईल? असे अनेक प्रश्न घेऊन वास्तुशास्त्रतज्ज्ञ डॉ. रविराज अहिरराव यांची भेट घेतली असता एखादं कोडं उलगडावं तसे हे प्रश्न उलगडत जातात आणि आधुनिक युगात वास्तुशास्त्र किती महत्त्वाचं आहे ते लक्षात येतं. डॉ. अहिरराव यांनी वास्तुशास्त्राचा सखोल अभ्यास करुन वास्तुशास्त्र रिसर्च फाऊंडेशन ही संस्था स्थापन केली आहे. त्यांच्या मार्गदर्शनाचा लाभ घेऊन हजारो कुटुंबं आज सुखाने नांदत आहेत. मुख्य म्हणजे आपल्या वास्तूची कोणत्याही प्रकारे तोडफोड न करता वास्तुदोष दूर करुन सुखाने कसं जगावं याची गुरुकिल्लीच डॉ. अहिरराव यांनी दिली आहे. 'वास्तुशास्त्र' या विषयाबाबत बोलताना पृथ्वी, आप, तेज, वायू, आकाश या पंचतत्त्वांना डोळ्यासमोर ठेवून वास्तुशास्त्राची निर्मिती करण्यात आली आहे. वास्तुशास्त्र म्हणजे निसर्गाशी एकरुप होण्याची अभ्यास पद्धती आहे. पंचतत्त्व आणि निसर्ग परस्परात मिसळून गेलेले आहेत. त्याचप्रमाणे आपलं शरीरही या पंचमहाभूतांनी बनलेलं आहे. आपल्या वास्तुमध्येही निसर्ग आणि शरीराच्या संतुलनानुसार पंचमहाभूतांचं संतुलन केलं तर निसर्ग-वास्तू आणि मानवी शरीर या तिघांमध्ये एक संपूर्ण संतुलन प्रस्थापित होईल. हा विचार करुनच वास्तुशास्त्राची

विशेष

निर्मिती झाली आहे. डॉ. अहिरराव यांचं हे स्पष्टीकरण ऐकताना आपल्यापैकी बहुतेकांना बऱ्याचदा अनुभवास आलेली एक गोष्ट लक्षात येते. एखाद्या घरात प्रवेश केला की तिथल्या वातावरणाचा आपल्या मनावर परिणाम होतो. काही वेळा एखाद्या घरात आपल्याला अगदी मोकळं आणि प्रसन्न वाटतं तर एखाद्या ठिकाणी

अवघडल्यासारखं होऊन तिथे जराही थांबू नये, अशी भावना मनात निर्माण होते. हा दोष त्या घरातील माणसांचा नसतो. त्या वास्तूचाच तो प्रभाव असतो. डॉ. अहिरराव यांनी या कुतुहलपोटीच वास्तूशास्त्राचा अभ्यास सुरु केला. १९९४ मध्ये सहजच वास्तुशास्त्रावरचा एक दिवाळी अंक त्यांनी विकत घेतला आणि अंक वाचताना हे कुतूहल वाढत गेलं. यातूनच वास्तूशास्त्र आणि 'फेंगशुई' याबाबत बोलताना डॉ. अहिरराव सांगतात, 'वास्तूशास्त्राप्रमाणेच फेंगशुईचा उद्देशही वास्तुदोष दूर करणे हाच आहे. खरं तर फेंगशुई हे शास्त्र मुळात आपल्याकडचं आहे. गौतम बुद्धांबरोबर जे ज्ञान पूर्वेकडे गेलं त्यामध्ये हे शास्त्रही होतं. फेंगशुईला काही भौगोलिक मर्यादा आहेत. या दोन्ही शास्त्रातला फरक व्यक्त करताना डॉ. अहिरराव म्हणतात, 'फेंगशुईमध्ये प्रत्येक व्यक्ती तिच्या फायद्यासाठी प्रतिकं ठेवते, पण भारतीय वास्तुशास्त्रात संपूर्ण घराचा विचार केला जातो. आपली प्रत्येकाची निर्मितीक्षमता दिशांवर अवलंबून आहे. त्यामुळेच वास्तुशास्त्रात दिशांना विशेष महत्त्व आहे. कोणतंही सृजनशील काम करताना आपलं तोंड ईशान्यकडे असणं आवश्यक आहे. उत्कृष्ट व्यवस्थापनासाठी व्यवस्थापकाने नैऋत्य दिशेला बसून ईशान्येकडे तोंड करावं. यामागचं शास्त्रही लक्षात घ्यायला हवं. सूर्याचे किरण ईशान्येकडे वळतात. भूमिगत पाण्याचे साठे ईशान्येकडे असल्यास सूर्यकिरणातील अतिनील किरणांमुळे या पाण्याचं आपोआपच शुद्धीकरण होतं. डॉ. अहिरराव यांच्या म्हणण्यानुसार आज ७० टक्के घरं अशास्त्रीय दृष्टिकोनातून बांधलेली असतात. त्यामुळे विविध दिशांनी निसर्गाकडून मिळणारी देणगी आपली अडथळे आणून अडवतो. सध्याच्या आधुनिक युगात तयार फ्लॅट घेताना वास्तुशास्त्राचा उपयोग कसा करायचा, असा प्रश्न अनेकांना पडतो. हळूहळू बांधकाम व्यावसायिकांना या शास्त्राचं महत्त्व पटायला लागलं असून आता इमारती बांधताना वास्तुशास्त्रतज्ज्ञाचा सल्ला घेतला जातो. मात्र हे प्रमाण अल्प आहे. अशा परिस्थितीतही बांधकामात आपण वास्तुशास्त्रानुसार अनेक बदल करु शकतो. त्यासाठी या क्षेत्रातील तज्ज्ञांचा सल्ला घ्यायला हवा. अशा सल्लागारांची वाढती मागणी लक्षात घेऊन या क्षेत्रातही काही भोंदू व्यक्तींनी प्रवेश केला आहे. अशांपासून सावध रहायला हवं. डॉ. अहिरराव यांनी या विविध ३० पुराणांचा आणि अनेक ग्रंथांचा अभ्यास करुन या क्षेत्रात बरंच संशोधन केलं असून ते अजूनही सुरु आहे. 'वास्तुशास्त्र रिसर्च फाऊंडेशन' या संस्थेच्या माध्यमातून वास्तुशास्त्राला जागतिक पातळीवर जागतिक स्तरावर शास्त्रीय परिभाषेत आणणं, प्राचीन वास्तुशास्त्राची आजच्या जीवनपद्धतीशी सांगड घालणं अशा उद्देशासाठी विविध उपक्रम राबवण्यात येत आहेत. वास्तुशास्त्राबद्दलचे गैरसमज दूर करुन या विषयाबाबत जनसामान्यांचं प्रबोधन करणं हे मुख्य उद्दिष्ट आहे. अभ्यासाचा आणि संशोधनाचा भाग म्हणून डॉ. अहिरराव आणि सौ. मंजुश्री अहिरराव या दांपत्याने आजवर साडे सात हजारहून अधिक वस्तुंचं निरीक्षण केलं आहे. संस्थेच्या माध्यमातून केवळ वास्तुशास्त्रासाठी सुसज्ज असं ग्रंथालय उभारण्याचा डॉ. अहिरराव यांचा मानस आहे. वास्तुशास्त्राचा लाभ सर्वांना घेता यावा आणि त्यातून सुचवलेले उपाय खर्चिक न होता सर्वसामान्यांना परवडतील असे व्हावेत हाही संस्थेचा उद्देश आहे. शासकीय आणि निमशासकीय संस्थांशी संपर्क साधून इमारती बांधतानाच वास्तुशास्त्राचा अवलंब करण्यासाठी त्यांना प्रवृत्त केलं जाणार आहे. वास्तुशास्त्र या विषयाचा आवाका फार मोठा आहे. अनुभवांती पटणारी ही शास्त्रीय गोष्ट आहे. आजवर हजारोंनी या शास्त्राचा आधार घेऊन आपल्या जीवनात आमूलाग्र बदल घडवून आणले आहेत. ज्यांना या विषयाबाबत अथवा वास्तुशास्त्र प्रशिक्षणाबाबत माहिती घ्यायची असेल त्यांनी डॉ. रविराज अहिरराव यांच्याशी ४, नीळकंठ कृपा, ब्राह्मण सेवा संघ हॉलसमोर, ब्राह्मण सोसायटी, नौपाडा, ठाणे (प) या पत्त्यावर अथवा (९५२२) २५३९९१८९, २५३३१९६० किंवा (९५२०) २४३७१६७३, २५८८४९२४ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधता येईल.

***